पोवाडा १

# देशाची कहाणी

## वंदन

वंदन हिंदभूचरणा, करावी करुणा । मूळपासुन गातो इतिहास मती द्यावि कवना ॥ १ ॥ मग नमन हिंद तरुणांना, राष्ट्रवीरांना । महादेव शाहिर विनवितो करा हो श्रवणा ॥ २ ॥

सात हजार वर्षांपूर्वी मूळ रहिवासी । नांव अनार्य ज्यासी । सदा वस्ती जंगलासी । आहार कच्च्या मांसासी । टोळी टोळी करून राहती । होती पूर्ण रानटी स्थिती ॥ १ ॥ संधि साधुन द्रवीड आले उत्तर बाजूनं । त्यांनी देश हा जिंकून । झाडि जंगल तोडून । शेतवाडी करून राहिले ॥ आर्यांनी त्यांस जिंकिले ॥ २॥

हे आर्य आले उत्तर ध्रुवापासून ॥
वसाहत केली पंजाब सुपीक पाहून ॥
देशाचि केलि उन्नत्ति सर्व बाजूनं ॥
समाजांत शिस्त केलि चार वर्ण नेमून ॥
स्मृति वेद ग्रंथ धार्मीक दिले निर्मून ॥

त्यावेळीं होता कैसा देश हिंदुस्थान । जिथं सुवर्णाची खाण । शास्त्र विद्या ह्यांचें स्थान । धर्मसंस्कृती ही छान । हेवा वाटे ग्रीक लोकांला चालले स्वारी करण्याला ॥ १ ॥ स्वारी करून आणूं म्हणती सर्व संपत्ती । बेत ठरवून चित्तीं । जाण्या मार्ग शोधीती । खिंड खैबर पाहती । स्वारि करिति त्याच मार्गानं ॥ हिंदूंची उडे दाणादाण ॥ २ ॥ तुर्की लोक स्वाऱ्या करती नाहीं गणती । एकी हिंदूंत नव्हती । स्वतःपुरतें पाहाती । आपसामध्यें भांडती । साधलें पराकि लोकांला ॥ त्या अरबी मुसलमानांला ॥ ३ ॥ चटक लागे मुसलमानां केली हो स्वारी । पहिला महंमद घोरी । लुट्न संपत्ती सारी । राज्य पंजाबावरी । पहिल्यानं त्यानं स्थापिलं ॥ हिंदूंच सौख्य संपलं ॥ ४ ॥

युरोपीय लोक मेंदू हुषार त्यांचा । शोध होकायंत्राचा । लावुन समुद्रावरचा । मार्ग हिंदुस्तानाचा । काढिला त्यांनीं शोधून ॥ आफ्रिकेला वळसा घालून ॥ ५ ॥ हजारो मैलावरनं येउन करिती व्यापार । ठेवून सचचेपणा फार । केला काबीज बाजार । हिंदू खूप अनिवार । पाशांत त्यांच्या गावले । इंग्रजाला पुरतें फावलें ॥ ६ ॥

पुढें पुढें दृष्टि व्यापाराची । कमी झाली त्यांची । राज्य

करण्याची । चटक लागली भारि साहेबांस ॥ सदा यश येई त्यांच्या
बांध्यास । जाणती सूज्ञ सकल इतिहास ॥ १ ॥
हिंदुस्तानाचि प्रजा बलवान ॥ पारि घेतलं राज्य साहेबानं ॥ १ ॥
राखिती राज्य हिंमतीनं ॥ सात हजार मैलावरनं ॥ २ ॥
इंग्रजी राज्य शांतिचें सौख्य सर्वांना ॥
नाना तन्त्र यंत्र निर्मिती सौख्यसाधना ॥
आगगाडी मोटार आणि विमान आणावं ध्याना ॥
फिरविली वीज घरोघर उजेड सर्वांना ॥
फोनोग्राफ लावुनी खुशाल ऐका गायना ॥
बिनतारी काढलं शोधून अचाट कल्पना ॥
कुठं त्यांची अशी ही प्रगती ॥ बेपर्वाई आमची वृत्ती ॥ १ ॥
कुणिकडं त्यांचि संघटना ॥ आम्हा नसे राष्ट्रभावना ॥ २ ॥
अशा समयिं हिंद तरुणांना एक प्रार्थना ॥
आधीं मिळवा ज्ञान मग स्वराज्याच्या वल्गना ॥
तुल्यबळ झाल्याविण कसा होईल सामना ॥
स्वतःपुरतें पाहण्याची वृत्ती । घातकी अती । म्हणुन अवनती ।
आली आजवर हिंद देशास ॥ संघटन करा शीघ्र समयास ।
महादेव शाहिर विनवी सर्वांस ॥